संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

श्रीराम शिक्षण संस्था धामणगांव रेल्वे व्दारा संचालित

**श्रीराम कला महिला महाविद्यालय, धामणगांव रेल्वे**

# राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## नियमित वार्षिक अहवाल
## सत्र- २०२२-२०२३

## कार्यक्रम अधिकारी


**डॉ. मोनाली इंगळे**

**श्रीराम कला महिला महाविद्यालय, धामणगांव रेल्वे**

# श्रीराम कला महिला महाविद्यालय धामणगाव रेल्वे, जि. अमरावती

## राष्ट्रीय सेवा योजना

## नियमीत वार्षिक अहवाल २०२२-२३

श्रीराम कला महिला महाविद्यालय धामणगांव रेल्वे येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग अत्यंत कृतीशिल कार्यक्षम विभाग म्हणून ओळखला जातो. हा विभाग विद्यार्थिनींमध्ये शिक्षणासोबत इतर व्यक्तीमत्व विकास विकसित करित असतो. या करिता प्रत्येक वर्षी विविध कार्यक्रमाचे आयोजन हा विभाग करित असुन यामुळे विद्यार्थी देखील या विभागाच्या कार्यक्रमांना उत्तम प्रतिसाद देत असतात. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य आणि सर्व घटक राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या कार्याकरिता सतत तत्पर असतात. अशा महाविद्यालयामधील एक महत्वाच्या विभागाचा थोडक्यात वार्षिक अहवाल पुढील कार्यक्रमांच्या माध्यमातुन तयार करण्यात आलेला आहे.

### १) आंतरराष्ट्रीय योग दिवसः - दिनांक - २१/०६/२०२२

श्रीराम कला महिला महाविद्यालयामध्ये आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडुन करण्यात आले होते. याकरिता राष्ट्रीय सेवा योजना विभाग महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. मोनाली इंगळे आणि शारिरीक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. सुधीर पाथरे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले. यावेळी डॉ. मोनाली इंगळे यांनी प्रास्तावीक केले आणि डॉ. सुधीर पाथरे यांनी योग दिनाचे महत्व सांगुन योगाबद्दल अभ्यासपूर्ण माहिती सांगितली त्यानंतर प्राचार्य डॉ.





नंदकिशोर राऊत यांनी आंतरराष्ट्रीय योग याबद्दल माहिती देऊन शुभेच्छा दिल्या . कार्यक्रमाला यावळी महाविद्यालयाचे सर्व घटक उपस्थीत होते.

**२) वृक्षारोपण कार्यक्रम :- दिनांक - १९/०७/२०२२**

श्रीराम कला महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडुन वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी प्राचार्य डॉ. राऊत सर उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राऊत सर उपस्थित होते. महाविद्यालयामध्ये विविध जातीचे वृक्ष लागवड करण्यात आली. यावेळी महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. मोनाली इंगळे, प्रा. नितीन बीहाडे प्रा. अभिजीत दौड व इतर शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थीत होते.







**३) १५ ऑगस्ट २०२२ (अमृत महोत्सव कार्यक्रम)**

स्वतंत्र्याचा अमृत महोत्सव अभियानाअंतर्गत हे अभियान सुरू करण्यात आले. **हर घर तिरंगा** अभियानाचे आयोजन श्रीराम कला महिला महाविद्यालयात पार पाडले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. राऊत सर विशेष अतिथी म्हणून श्री. विनोद इंगळे केंद्र संचालक कामगार कल्याण मंडळ धामणगांव रेल्वे, डॉ. सुधीर पाथरे , डॉ. काशीकर , डॉ. मोनाली इंगळे महिला कार्यक्रम अधिकारी, प्रा नितीन बिहाडे , प्रा. अभिजीत दौड उपस्थीत होते.

यामध्ये डॉ. सुधीर पाथरे यांनी भारतीय ध्वजसंहिता विषय घेवून त्यांचे पालन कसे करावे हे सांगितले प्रा. बीहाडे यांनी या प्रसंगी विविध क्रांतीकारकांच्या विचारांचे महत्व सांगितले. प्रा. अभिजीत दौड यांनी भारतीय ध्वज व त्याचा इतिहास विद्यार्थ्यांना सांगितला त्याच बरोबर प्रत्येक नागरींकांना ध्वजसंहितेचे पालन करून दिनांक : ११ ते १६ ऑगष्ट या दरम्यान प्रत्येक विद्यार्थीनींनी आपआपल्या घरावर भारतीय ध्वज फडकवावा असे आवाहन केले. त्याच बरोबर **माझा तिरंगा माझी जबाबदारी** याचे महत्व विद्यार्थीनींना समजावुन सांगितले.

स्वातंत्रयाच्या अमृत महोत्सवानीमीत्य अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये **हर घर तिरंगा** अभियानाचे आयोजन **माझा तिरंगा माझी जबाबदारी, हर घर तिरंगा हर मन तिरंगा** पदयात्रेचे आयोजन रांगोळी स्पर्धेचे आयोजन, निबंध स्पर्धेचे आयोजन, असे विविध उपक्रम महाविद्यालयाव्दारे स्वातंत्रयाचा अमृत महोत्सव या काळात राबविण्यात आले.

कार्यक्रमात महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी झाले होते. तसेच विद्यार्थीनी सुध्दा बहुसंख्येने उपस्थित होत्या.

1) **हर घर तिरंगा' अभियानाचे आयोजन :-**







2) **माझा तिरंगा माझी जबाबदारी- झेंडा वितरण :-**






3) "हर घर तिरंगा- हर मन तिरंगा" विशाल स्वराज्य महोत्सव पदयात्रेचे आयोजनः-







4) रांगोळी स्पर्धचे आयोजन :-









5) निबंध स्पर्धचे आयोजन :-





**४) पोषण सप्ताह :- ( १ सप्टेंबर ते ७ सप्टेंबर )**

श्रीराम कला महिला महाविद्यालय धामणगांव रेल्वे येथे राष्ट्रीय सेवा योजना आणि गृहअर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय पोषण सप्ताह आयोजीत करण्यात आला या कार्यक्रमामध्ये विभागाच्या वतीने **डीश डेकोरेशन स्पर्धा, सलाद स्पर्धा, व ग्रीटींग स्पर्धा** आयोजीत करण्यात आली होती यावेळी महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. मोनाली इंगळे यांनी आहाराचे महत्व आणि गरज यावर प्रास्तावीकपर मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे उद्धाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राऊत सर यांनी केले तर या कार्यक्रमाकरीता परिक्षक म्हणून महाविद्यालयाच्या ग्रंथपाल डॉ. नीता केने, घोपे मॅडम , डॉ. सुधीर पाथरे हे होते. या कार्यक्रमात भाग घेतलेल्या स्पर्धांनमध्ये क्रमांक मिळालेल्या विद्यार्थीनींना बक्षीस देण्यात आले. या कार्यक्रमात बक्षीस वितरण प्रा. अभिजीत दौड सर, प्रा. नीतीन बीहाडे सर, व डा. पाथरे सर यांनी केले.

स्पर्धामध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थीनींनी हिरीतरीने भाग घेतला आणि चांगला प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.






**५) राष्ट्रीय सेवा योजना दिवस :- दिनांक - २४/०९/२०२२**

राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. राऊत सर ,अतीथी पाथरे सर , प्रा. दौड सर , प्रा. बीहाडे सर मंचावर उपस्थीत होते. यावेळी विद्यार्थिनींना राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्याबद्दल माहिती देण्यात आली. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थीत होते.



### ६) शहिद भगतसिंग जयंती :-  दिनांक - २८/०९/२०२२

राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून महाविद्यालयामध्ये शहिद भगत सिंग जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. मोनाली इंगळे होत्या. तर प्रमुख अतिथी डॉ. पाथरे सर , आणि वक्ते प्रा. दौड सर यांनी भगतसींग यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. विद्यार्थिनींना भगतसींगाबद्दल माहिती सांगीतली कार्यक्रमाला डॉ. केने मॅडम, प्रा. बोहाडे सर व बहुसंख्येने विद्यार्थीनी उपस्थीत होत्या .






**७) स्वच्छता अभियान :- दिनांक -२०/१०/२०२२**

महाविद्यालयाच्या **राष्ट्रीय सेवा योजना** विभागाकडून स्वच्छता अभियान घेण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राध्यापक वर्ग आणि शिक्षकेत्तर कर्मचारी त्याचबरोबर बहुसंख्येने विद्यार्थीनींनी सुध्दा आपला सहभाग नोंदवीला होता.



**८) संविधान दिन :- दिनांक - २६/११/२०२२**

श्रीराम कला महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि राज्यशास्त्र विभागाकडुन महाविद्यालयामध्ये संविधान दिनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य होते तर प्रमुख पाहुणे सौ सरोज आवारे, वक्त्या सुजाता गायकवाड होत्या सर्व प्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. त्यानंतर पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले.

सर्व प्रथम महाविद्यालयाच्या मैदानावर प्रास्ताविका वाचन करण्यात आली. प्रा. नितीन बिहाडे यांनी वाचन केले यावेळी सर्व कर्मचारी व विद्यार्थीनी ऊपस्थीत होत्या.

कार्यक्रमाचे वक्ते सौ. सरोज आवारे यांनी संविधानाचे विविध पैलु सांगितले तर अतिथी यांनी उद्देशपत्रीकेचे उद्दीष्टे व स्वरूप विद्यार्थी नींना समजावुन सांगीतले कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रीना सराटे यांनी केले व आभार प्रदर्शन निधी खडसे यांनी केले कार्यक्रमाला डॉ. मोनाली इंगळे , डॉ. सुधीर पाथरे , प्रा. अभिजीत दौड, डॉ. रोजेश आडे, डॉ. निता केने , प्रा. घोपे आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थीत होते.






**९) महात्मा ज्योतीबा फुले पुण्यातिथी :- दिनांक :२८/११/२०२२**

श्रीराम कला महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकाव्दारे महात्मा ज्योतीबा फुले यांना आदरांजली वाहण्यात आली यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राऊत सर, वक्त्या घोपे मॅडम यांनी ज्योतीबांबद्दल त्यांच्या जीवनाची गाथा विस्तृतपणे मांडून विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला ग्रंथपाल डॉ. नीता केने आणि महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. मोनाली इंगळे उपस्थीत होत्या.





## १०) जागतीक एड्स दिन :- दिनांक - ०१/१२/२०२२.

विद्यार्थीनींच्या आरोग्याबद्दल देखील राष्ट्रीय सेवा योजना विभाग विशेष कार्य करत असतो. या दृष्टीकोणातुन विद्यार्थीनींना घातक असलेल्या आजाराविषयीची माहिती देण्यात आली कार्यक्रमाला महाविद्यालयाचे शारिरीक शिक्षण संचालक डॉ. पाथरे सर अध्यक्षस्थानी होते. आणि प्रमुख वक्ते प्रा. अभिजीत दौड सर होते. महाविद्यालयातील विद्यार्थीनींना एड्स विषयी जनजागृती करून त्यांचे मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यावेळी उपस्थीत होते.






**११) महापरिनीर्वाण दिन : दिनांक - ६ /१२/ २०२२**

श्रीराम कला महिला महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेउकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमीत्य आदरांजली वाहण्यात आली यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राऊत सर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला हार अर्पण केले तसेच सर्व विद्यार्थीनींना महामानवाला अभिवादन केले कार्यक्रमाला सर्व प्राध्यापक वर्ग आणि शिक्षकेत्तर कर्मचारी ऊपस्थीत होते.






## १२) मतदार जनजागृती दिवसः- दि. ८/१२/२०२२

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि राज्यशास्त्र विभागाकडून मतदार जनजागृती आणि मतदार नोंदणी अभियान घेण्यात आले. महाविद्यालय मध्ये हा उपक्रम प्रत्येक वर्षी घेण्यात येत असतो. प्रत्येक वर्षी नवीन आलेल्या विद्यार्थीनींची नोंदणी करण्याचे कार्य या विभागाव्दारे केले जात असते आणि त्याचसोबत मतदान जनजागृती करून मतदानाची टक्केवारी वाढावी या करिता प्रत्येकाने आपले मतदान करणे कसे आवश्यक आहे हे देखील विभागाने सांगितले होते.





**१३) गाडगे महाराज पुण्यतिथी :- दिनांक -२०/१२/२०२२**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने गाडगेमहाराजांना आदरांजली अर्पण करण्यात आली. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी संत गाडगेमहाराजांच्या फोटोला हारारर्पण करून आदरांजली दिली. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थीनी शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थीत होते.






## १४) डॉ. पंजाबराव देशमुख जयंती :- दिनांक- २७/१२/२०२२

श्रीराम कला महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या कडुन शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकिशोर राऊत यांनी शिक्षण महर्षीच्या प्रतिमेचे पूजन केले आणि त्यानंतर महाविद्यालयातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी प्रतिमेला अभिवादन केले कार्यक्रमाला महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थीनी उपस्थीत होत्या.






**१५) सावित्रीबाई फुले जयंती :- दिनांक - ०३/०१/२०२३**

श्रीराम कला महिला महाविद्यालय धामणगांव रेल्वे येथे सावित्रीबाई फुले जयंती बालीका दिन म्हणून साजरी करण्यात आली यावेळी महाविद्यालयाच्या महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. मोनाली इंगळे यांनी प्रतिमेचे पुजन करून हार अर्पण केले स्त्री शिक्षणाची प्रणेती असल्यामुळे सर्व महाविद्यालयातील विद्यार्थीनींनी सावीत्रीबाई फुले यांना आदरांजली वाहीली यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थीत होत्या.






**१६) युवक दिन :- दिनांक -१२/०१/२०२३**

श्रीराम कला महिला महाविद्याविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजना व कामगार कल्याण केंद्र धामणगांव रेल्वे यांचे संयुक्त विद्यमाने युवा दिन साजरा करण्यात आला अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राऊत सर होते. तर कामगार कल्याण मंडळाचे श्री. इंगळे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थीत होते. त्यांनी विद्यार्थीनींना अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाला महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. मोनाली इंगळे , प्रा. बीहाडे, प्रा. दौड, डॉ. पाथरे सर डॉ. केने, डॉ. आडे तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थीनी उपस्थीत होत्या.






**१७) राष्ट्रीय मतदार दिवस :- दिनांक -२५/१/२०२३**

महाविद्यायलाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राज्यशास्त्र विभाग यांच्या वतीने या दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. मतदार दिनानीमीत्य रांगोळी स्पर्धेच आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला धामणगांव रेल्वे येथील नायब तहसीलदार श्री. मंडपे साहेब उपस्थीत होते शासकीय आदेशानुसार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आणि या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकिशोर राऊत, डॉ. पाथरे, डॉ. आडे , डॉ. निता केणे, प्रा. बिराडे, प्रा. अभीजीत, डॉ. काशीकर, तसेच महिला कार्यक्रम आधिकारी डॉ. मोनाली इंगळे हे उपस्थीत होत्या तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी ही उपस्थीत होते तसेच महाविद्यालयाच्या विद्यार्थीनिंनी उस्फुर्ततेने सहभाग घेतला होता.






**१८) गाडगे महाराज जयंती: - दिनांक -२३/०२/२०२३**

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने संत गाडगे महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.बिहाडे सर यांनी प्रतीमेचे पुजन करून हार अर्पण केले तसेच कार्यक्रमाला महिला अधिकारी डॉ. मोनाली इंगळे , प्रा. दौड सर उपस्थीत होते . शिक्षकेत्तर कर्मचारी शरद गवारले, कल्पना चव्हाण, राजेश भैय्या उपस्थीत होते. महाविद्यालयाच्या बहूसंख्य विद्यार्थीनी कार्यक्रमाला उपस्थीत होत्या.






**१९) जागतिक महिला दिन :- दिनांक - ०८/०३/२०२३**

धामणगाव रेल्वे येथील श्रीराम कला महिला महाविद्यालय मधील राष्ट्रीय सेवा योजना व नेहरू युवा केंद्र धामणगांव रेल्वे यांच्या संयुक्त विद्यमाने साजरा करण्यात आला कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकिशोर राऊत, तर प्रमुख वक्त्या सौ. सरोज आवारे आणि प्रमुख अतिथी सुजाता गायकवाड होत्या

कार्यक्रमाचे प्रास्तावीक महिला अधिकारी डॉ. मोनाली इंगळे यांनी केले प्रमुख वक्त्यांनी महाविद्यालयातील विद्यार्थिनींना महिला सबलीकरणावरती मार्गदर्शन केले सुजाता गायकवाउ यांनी विद्यार्थीनींना अतीशय मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन शिवाणी पंधरे यांनी केले आणि आभार प्रदर्शन उज्वला मेश्राम यांनी केले कार्यक्रमाला डॉ. नीता केणे , प्रा. सुवर्णा धोपे , डॉ. पाथरे, डॉ. आडे , डॉ. काशीकर , प्रा. दौड, प्रा बीहाडे व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थीत होते.







अशा प्रकारे महाविद्यालच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग विद्यार्थ्यांच्या विविध विकासात्मक गुणांना वाव देण्याकरिता कार्यरत असतो या करिता महाविद्यालयाचे प्राचार्य, महिला कार्यक्रम अधिकारी सतत मेहनत घेत असतात विद्यार्थीनी देखील मोठ्या उत्साहाने या उपक्रमामध्ये सहभागी होऊन राष्ट्रीय सेवा योजना माध्यमातुन राष्ट्रीय आणि सामाजीक कार्यात रूची घेतात.